**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**

# रस्ते सफाईकडे दुर्लक्ष ?

**नागरिकांचा आरोप; रस्त्यावरील मातीच्या थरामुळे अपघाताचा धोका**

**// खुलासा //**

मिरा भाईदर महानगरपालिका कायक्षेत्रात कनाकिया रोड, मिरारोड पुर्व या ठिकाणी सुरू असलेल्या बांधकाम साईटमुळे 1) साईटवर ये-जा करताना डंपरच्या चाकांव्दारे चिखल रस्त्यावर पडणे 2) रस्ता चिखलमय व धोकादायक होणे 3) रस्त्यावर पडलेला चिखल वाळून त्याची धुळ होऊन वायू प्रदूषण होणे इत्यादीमुळे स्थानिक नागरिकांना आणि प्रवाशांना डोळ्यांत, श्वासमार्गात त्रास होऊन नागरीकांच्या आरोग्याला आणि सुरक्षिततेला धोका निर्माण करत असल्याची बातमी वृत्त्पत्रात प्रसिध्द् झाली आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिकेने बांधकाम पाडकाम व्यावसायिकांसाठी वायु प्रदुषण नियंत्रणासाठी मार्गदर्शक तत्वे प्रसिद्ध केलेली आहेत. तसेच याबाबत दि. 30/04/2025 रोजी मा. आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी सर्व बांधकाम / पाडकाम व्यावसायिक यांची बैठक घेऊन सदर मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) कनकिया रोड बील लोटस हॉस्पीटल समोर मे. संटेक बिल्डर यांचे बांधकाम प्रकल्प सुरु आहे. सदर प्रकल्प ठिकाणी ये-जा करणाऱ्या डंपरच्या टायरला चिकटलेला चिखल रस्त्यावर पडत आहे. सदर चिखलाच्या धुळीमुळे वायु प्रदुषण होत आहे. तसेच रस्त्यावरुन ये-जा करणाऱ्या दुचाकी वाहनांचे अपघात होत आहे. सदर मे. संटेक बिल्डर मालक यांच्यावर गुन्हा दाखल करणे आवश्यक असल्याने संबधित , प्र. स्वच्छता निरीक्षक यांना प्राधिकृत करून त्यांच्या मार्फत मे. संटेक बिल्डर मालक यांच्यावर दि. ११/०६/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून संबधति विकासकांन कडून रक्कम रु. २५,५००/- दंड आकारण्यात आलेला आहे. .त्याच प्रमाणे महापलिके मार्फत सदर रस्त्यावरील पडलेला चिखल सफाई करून घेण्यात आला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते सफाई बाबत अडचणी असल्यास मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या टोल फ्री क्रमांकावर १८००२२४८४९ संपर्क साधावा असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. राधाबिनोद अरिबम शर्मा (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.

**(डॉ. सचिन बांगर)**
**उपायुक्त (घ.व्य.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

ता.जि.ठाणे-४०१ १०१, दुरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८, Email :- pro@mbmc.gov.in

## माहिती व जनसंपर्क विभाग


जा.क्र.मनपा/मावज/खुला./ ८५ /२०२५-२६

दि.१२/०६/२०२५

प्रति,

सहा. आयुक्त,

घनकचरा व्यवस्थापन विभाग.

मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय :- वृत्तपत्रांत प्रसिध्द झालेल्या बातमी/ बातम्यांचा खुलासा सादर करणेबाबत.**

संदर्भिय विषयाच्या अनुशंगाने आपल्या विभागाच्या कामकाजाविरुध्द खालील वृत्तपत्रामध्ये बातमी / बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. ज्यामुळे महानगरपालिकेची प्रतिमा मलिन होत असल्याचे दिसुन येत आहे.

| अ.क्र. | वृत्तपत्रांचे नाव | दिनांक |
|---|---|---|
| १. | दै. लोकसत्ता | १२/०६/२०२५ |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |
| ६. | | |

तरी संबंधित बातमी / बातम्यांची योग्य ती दखल घेऊन त्याचे खंडन अथवा वस्तुस्थिती दर्शक खुलासा मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेसह संबंधित वृत्तपत्रात प्रसिध्द करणेकरिता आवश्यक कागदपत्रांसह कृपया त्वरीत त्याच दिवशी दुपारी 2.30 वाजेपर्यंत उपलब्ध करुन दयावा हि विनंती.

राजकुमार घरत
**माहिती व जनसंपर्क अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

सोबत वृतपत्रातील प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या छायांकित प्रत / प्रती जोडल्या आहेत.

**प्रत माहितीस्तव :**

1) मा.आयुक्त सो.
मिरा भाईंदर महानगरपालिका

2) मा. अतिरिक्त सो.(१,२)
मिरा भाईंदर महानगरपालिका

3) मा. उपआयुक्त सो. (माहिती व जनसंपर्क)
मिरा भाईंदर महानगरपालिका

४) मा. शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

# रस्ते सफाईकडे दुर्लक्ष?


## नागरिकांचा आरोप; रस्त्यावरील मातीच्या थरामुळे अपघाताचा धोका

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** मिरा, भाईंदर शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात माती साचून रस्ते निसरडे झाले आहेत. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. मात्र तरीदेखील महापालिका प्रशासनाकडून रस्ते सफाईकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

पावसाने यंदा लवकर हजेरी लावल्यामुळे मिरा, भाईंदरमधील बांधकाम व्यावसायिकांनी आपल्या कामांची गती वाढवली आहे. यामध्ये बांधकाम स्थळांवरील माती व डेब्रिजची वाहतूक तसेच इतर साहित्याची सतत ने-आण केली जात आहे. मात्र यामुळे रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात माती पडत असून रस्ते खडबडीत व निसरडे झाले आहेत. प्रामुख्याने मातीची वाहतूक करणाऱ्या डम्परवर कारवाई करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे; परंतु याकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्यामुळे हे प्रकार सातत्याने घडत आहेत.

रस्त्यांवर माती साचलेली असताना तिची स्वच्छता करण्याची जबाबदारी महापालिका प्रशासनावर आहे. यासाठी सफाई कर्मचारी नेमण्यात आले असून त्यांच्यावर दैनंदिन रस्ते सफाईचे काम सोपवण्यात आले आहे. मात्र, शहरातील काही अंतर्गत रस्त्यांव्यतिरिक्त इतर ठिकाणी रस्ते सफाईचे काम होत नसल्याचे समोर आले आहे. परिणामी, गेल्या अनेक दिवसांपासून रस्त्यांवर माती साचलेली असून थोड्याशा पावसात चिखलाचे साम्राज्य निर्माण होत आहे. यामुळे दुचाकींच्या अपघातांचा धोका वाढला आहे. तर पाऊस थांबतो तेव्हा ती धूळ सुकून हवेत उडून प्रदूषण निर्माण होत आहे. पावसाच्या विश्रांतीच्या काळात शहरातील रस्ते स्वच्छ करून घेण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.



### पाण्याचा मारा बंद

मिरा, भाईंदर शहरात धूळ पसरू नये म्हणून रस्त्यांवर साचलेल्या मातीवर पाण्याचा मारा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यासाठी अग्निशमन दल व धूळ नियंत्रण वाहनांचा वापर केला जात होता. मात्र, पावसाच्या आगमनानंतर हे काम बंद करण्यात आले. दरम्यान, मागील काही दिवसांपासून पावसानेही विश्रांती घेतल्यामुळे पुन्हा एकदा धुळीचा त्रास जाणवू लागला असून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे.

Scanned with OKEN Scanner